N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** उमदी **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0135 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/06/2021 07:16 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 22/06/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/06/2021
**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/06/2021 **Time (वेळ):** 06:53 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 010 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/06/2021 06:53 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 30 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** संख ते असंगी जाणारे रोडवर इराप

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री. दत्तात्रय रावसाहेब पवार

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | काराजनगी,जत,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | काराजनगी,जत,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9309557505

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हणमंत म्हेत्रे | | | 1. ता जत,जत,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | विशाल विष्णू उदगीरे | | | 1. संभाजीनगर जत,जत,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2,30,000/ रू. | 230,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 230,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब ता.23.6.2021मी दत्तात्रय रावसाहेब पवार वय 45 वर्ष व्यवसाय-शेती रा. काराजनगी ता. जत जि. सांगली मो.नं 9309557505.मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास असून मी शेती तसेच माती वाहतूक करतो. माझ्याकडे टाटा एल.पी.के. टिप्पर एम एच 46 बी.एफ 8283 व टाटा एल.पी.के. टिप्पर जे.एच.13 एफ 3040 अशी दोन वाहने आहेत. दि.25.05.2021 रोजी रात्री 12 वाजण्याचे सुमारास शिवाप्पा गोरगुंड यांचे कोळीगीर ता. जत यांचे मालकीच्या एका शेतामूधन त्यांचेच दुसया शेतामध्ये माती वाहतूक करीत असताना माझे वरील दोन्ही वाहने अपर तहसिलदार म्हेत्रे व तलाठी उदगीरे यांनी आडवून अपर तहसिलदार कार्यालय संख या ठिकाणी लावली आहेत. त्यावेळी मी अप्पर तहसिलदार साहेब म्हेत्रे यांची भेट घेवून त्यांना गाडया सोडण्याबाबत विनंती केली असता अप्पर तहसिलदार साहेब म्हेत्रे यांनी मला तुम्ही माती वाहतूक करीत असून तुमची पकडण्यात आलेल्या दोन्ही वाहनावर एकूण 8,00,000/- रूपये दंड होत आहे, तुम्हाला दंड नको असेल तर 2,50,000/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले. त्यावर मी त्यांना एवढी रक्कम मला देता येणार नाही असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी मला 2,50,000/- रूपये दिल्याशिवाय तुमची वाहने सोडता येणार नाहीत असे सांगून तलाठी उदगीरे यांची भेट घेण्यास सांगीतली त्यावेळी तलाठी उदगीरे यांची भेट घेतली असता त्यांनी देखील म्हेत्रे साहेबांनी सांगीतलेप्रमाणे 2,50,000/- रूपयाची तयारी करून येण्यास सांगीतले. त्यावेळी मी त्यांना 2,50,000/- रूपये देण्यास नकार देवून निघून आलो. अद्याप पर्यंत त्यांनी माझ्या वाहनावर कोणतीही कारवाई केली नसून माझी वाहने सोडलेली नाहीत.मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.05.06.2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात हजर होवुन श्री.घाटगे साहेब, पोलीस उप अधीक्षक यांना भेटून माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. घाटगे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत सविस्तर माहिती दिली. मी दि.09.06.2021 रोजी म्हेत्रे साहेब यांना भेटणार असल्याचे घाटगे साहेब यांना सांगीतले त्याप्रमाणे घाटगे साहेब यांनी मला दि.09.06.2021 रोजी जत येथे येत असल्याबाबत सांगीतले होते.त्याप्रमाणे दि. 09.06.2021 रोजी घाटगे साहेब यांनी संपर्क केल्यानंतर मी घाटगे साहेब यांची जत या ठिकाणी जावून भेट घेतली. त्यावेळे घाटगे साहेब यानी त्यांचे सोबत आले दोन्ही पंच साक्षीदार व त्यांचे पथकाची ओळख करून दिली. घाटगे साहेब यांनी मला, पंचाना माझे तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगणेस सांगीतली. त्याप्रमाणे मी त्यांना माझे तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगीतली. त्यानंतर माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचानी वाचून त्यावर सहया केल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डरबाबत मला व दोन्ही पंचाना माहिती देवून नवीन मेमरी कार्ड डिजीटल



Scanned with CamScanner

व्हाईस रेकर्डरमध्ये टाकले. त्यानंतर घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे 9309557505 या मोबाईल क्रमांकावरून तलाठी उदगीरे यांचे 9850776808 या मोबईलक्रमांकावर संपर्क करून माझ्या मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला. लागलीच घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करून माझ्यासमोर धरला. श्री. उदगीरे यांनी कल स्विकारल्यानंतर मी त्यांना भेटण्या संदर्भात विचारले नंतर श्री. उदगीरे यांनी माडग्याळला येत असल्याचे सांगून माडग्याळ येथे येण्यास सांगीतले. आमचा कल झाल्यानंतर घाटगे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर बंद केला. श्री. उदगीरे हे माडग्याळ येथे त्यांचे तलाठी कार्यालयात येणार असल्याचे समजून आल्याने माडग्याळ येथे जावून श्री. उदगीरे यांची पडताळणी कारण्याचे सर्वानुमते निश्चित केले.त्यानंतर घाटगे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे त्यांचेकडील शासकीय वाहनाने तसेच मी माझ्याकडील स्कपिओ गाडी नं.एमएच-10-बीएम-2392 मधून जत येथून रवाना होवून माडग्याळ ता. जत या गावचे काही अंतर आलीकडे आलेनंतर घाटगे साहेब यांनी त्यांचे वाहन रोड कडेला थांबवले. पाठोपाठ मी देखील त्या ठिकाणी दाखल झालो. त्यानंतर घाटगे साहेबांनी माझ्यात व तलाठी उदगीरे यांचेत होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्याचे निश्चीत करुन घाटगे साहेयांनी मला व पंच कांबळे यांना पडताळणी कामी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे अंगावरील पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी दिले सुचने प्रमाणे मी व पंच कांबळे अरे तलाठी उदगीरे यांची यांची भेट घेणेकामी माझेकडील स्कारपीओ गाडीमधून रवाना होवून तलाठी माडग्याळ कार्यालयाचे परीसरात दाखल झालो. मी माझी गाडी पार्क करुन मी व पंच कांबळे असे तलाठी कार्यालयात गेलो. माझी तलाठी उदगीरे यांचीशी भेट झाल्यानंतर तलाठी उदगीरे यांना मी माझ्या वाहना संदर्भात चर्चा करून त्यांना तहसिलदार साहेबांनी तुमच्याकडे पाठवले असल्याबाबत सांगीतले. त्यावेळी उदगीरे यांनी मला सदरचे प्रकरण प्रांत साहबांकडे गेल्याचे सांगून साहेबांशी बोलून संध्याकळी फोन करतो असे सागीतले. आमच्यातील चर्चा झाल्यानंतर मी व पंच कांबळे त्या ठिकाणावरून निघून घाटगे साहेबाच्या समक्ष हजर झालो. त्यावेळी घाटगे साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे तावेत घेतला. घाटगे साहेब यांनी पंच कांबळे व मला घडलेली हकीकत विचारली असता पंच कांबळे व मी घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर सायंकाळी 7.00 वाजण्याचे सुमारस तसेच सायंकाळी 7.30 वाजण्याचे सुमारास मी उदगीरे यांना संपर्क केला असता उदगीरे यांनी प्रथम मला जत येथे येत असल्याचे सांगीतले व नंतर त्यांनी मला घरी असल्याचे सांगून भेट होणार नसल्याचे सांगीतले. त्यानंतर घाटगे साहेब यांनी त्या दिवशीची कारवाई स्थगीत करून मला आवश्यकत्या सुचना देवून घाटगे साहेब व त्यांचे पथक निघून गेले. त्यानंतर दि.10.06.2021 रोजी मी माझ्या मोबाईलवरून उदगीरे तलाठी यांना संपर्क केला होता. त्यावेळी उदगीरे यांनी मला अपर तहसिलदार साहेबांना येवून भेटा असा निरोप दिला होता. त्याप्रमाणे मी घाटगे साहेब यांना उदगीरे यांचे निरोपाबाबत कळवले होते.त्याप्रमाणे दि.11.06.2021 रोजी घाटगे साहेब व त्यांचे पथक असे संख येथे हजर झाले. घाटगे साहेब यांनी संपर्क केल्यानंतर मी घाटगे साहेब यांचे समक्ष हजर होवून त्यांची भेट घेतली. त्यावळी घाटगे साहेब यांनी श्री. म्हेत्रे अपर तहसिलदार यांची पडताळणी करण्याचे ठरवून मला व पंच कांबळे यांना सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच कांबळे असे माझ्याकडील होंडा शाईन मोटरसायकल नंबर एमएच-10-जे.वाय-9549 वरून रवाना होवून अपर तहसिलदार कार्यालय संख या ठिकाणी जावून कार्यालयात अपर तहसिलदार साहेबांबाबत चौकशी केली असता त्या ठिकाणी असले कर्मचारी यांचेकडून अपर तहसिलदार साहेब त्यांचे घरी असल्याची माहिती मिळाली. मला अपर तहसिलदार म्हेत्रे साहेबांचे घर माहित असल्याने मी व पंच कांबळे असे माझ्याकडील मोटरसायकलीवरून अपर तहसिलदार म्हेत्रे यांचे राहते घरा जवळ जावून माझी मोटर सायकल पार्क करून मी व पंच कांबळे असे चालत म्हेत्रे साहेबांच्या खालीजवळ जावून दरवाज्या वाजवला असता आतून दरवाजा उघडून म्हेत्रे साहेब बाहेर आले. त्यांनी मला बघून इथं कशाला आलाय असे म्हणून ऑफिसला चला असू म्हणून ऑफिसला जाण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच कांबळे त्या ठिकाणावरून निघून घाटगे साहेब यांचे समक्ष हजर झालो. घाटगे साहेबांनी माझ्याकडील डिजीटल व्हईस रेकर्डर त्यांचे ताबेत घेवून बंद केला. घाटगे साहेबांनी विचारले वरून पंच कांबळे व मी घडलेली हकीकत सांगितले व डिजीटल व्हईस रेकर्डर मधील वरील प्रमाणे झालेले संभाषण मी, घाटगे साहेब तसेच दोन्ही पंचांने ऐकले. त्यानंतर घाटगे साहेबांनी मला व पंच कांबळे यांना सुचना देवून डिजीटल व्हईस रेकर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. घाटगे साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच कांबळे असे माझ्याकडील मोटार सायकलवरून रवाना होवून अपर तहसिलदार कार्यालय संख या ठिकाणी हजर झालो. त्यानंतर मी व पंच कांबळे असे कार्यालयात गेलो त्यावेळी अपर तहसिलदार म्हेत्रे साहेब अजून कार्यालयात आले नव्हते त्यामुळे आम्ही त्याठिकाणी थांबून राहिलो. त्यानंतर मी माझे मोबाईलवरून उदगिरे तलाठी यांना संपर्क करून संख मध्ये आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी उदगिरे यांनी मला ऑफीसला येत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच कांबळे असे अपर तहसिल कार्यालयाचे बाहेर थांबून राहिलो. काही वेळानंतर तलाठी उदगिरे हे आम्ही थांबलो त्याठिकाणी आले. त्यावेळी त्यांनी मला समोर बोलणार नाहीत तुम्हाला चिडतील ते, प्रांत साहेबांना भेटून या बाकी गाडीच काय सांगायच नाय, एकच गाडी सांगायची, दोन शिव्या खावून यायच्या, साहेब म्हणलेत की नाय या म्हणून असे म्हणाले. त्यावर मी त्यांना हा करतोय म्हणटलय असे म्हणालो त्यावर त्यांनी मग संपवा की विषय प्रांत साहेबांना भेटा, कमी जास्त करायचा विषय आला की ते विचारतील, तिकडून फोन येवूदे, मग अपर साहेब काय म्हणत्यात बघू असे म्हणाले. त्यानंतर आमच्यात मातीच्या ट्रिपा बाबत चर्चा झाली. त्यावर मी त्यांना तहसिलदार यांना भेटतो असे म्हणून तुम्ही बोलतच नाय असे म्हणाले त्यावर उदगिरे यांनी मला तुम्ही खिशातन पैसे काढायचे आणि आण्णासाहेबांना द्यायचे, बोलायचे काय त्यात, तुम्ही काय करायला पाहिजे माहितेय का, आण्णासाहेब हे ठेवा लक्ष असू दे, साहेब म्हणत्यात की 12 - 13 लाख रूपये भरा, साहेबांनी सांगितले की मी करतोय, असे म्हणाले. आमच्यात चर्चा चालू असताना अपर तहसिलदार म्हेत्रे साहेब कार्यालयात आले व त्यांचे केबीनमध्ये गेले. आम्ही देखील त्यांचे पाठोपाठ केबीन मध्ये गेलो. त्यावेळी म्हेत्रे साहेबांनी मला तुला कोणी सांगितलय घरी यायला, काय ते उदगिरेला विचार, उदगिरेन काय पंचनामा दिला हाय त्याप्रमाणे करायला लागणार असे म्हणाले. त्यावर मी त्यांना सहकार्य करण्याबद्दल विनंती केली. त्यावर म्हेत्रे साहेबांनी पहिल्यांदा तुझ 10 लाख रूपये दंड होत होता, दोन लाखात काम केलेय, प्रत्येक वेळेला सोडायचे म्हटल तर बर दिसत नाय असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना एकवेळा माफ करा असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला काय करणार आता असे विचारले, त्यावर मी त्यांना तुम्ही सांगाल तसे करतो असे म्हणालो. त्यावेळी म्हेत्रे साहेबांनी उदगिरे यांना काय करणार आता हेच, कस करणार असे विचारले. त्यावर उदगिरे यांनी म्हेत्रे साहेबांना प्रांत साहेबांना भेटून या, तिथून फोन आल्यावर बघू असे म्हणाले. आमच्यातील चर्चा झाल्यानंतर आम्ही तेथून निघून घाटगे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यानंतर घाटगे साहेबांनी माझ्याकडील डिजीटल व्हईस रेकर्डर त्यांचे ताबेत घेवून बंद केला. घाटगे साहेबांनी विचारले वरून पंच कांबळे व मी घडलेली हकीकत सांगितले व डिजीटल व्हईस रेकर्डर मधील वरील प्रमाणे झालेले संभाषण मी, घाटगे साहेब तसेच दोन्ही पंचांने ऐकले. त्यानंतर घाटगे साहेबांनी त्यावेळची कार्यवाही स्थगित करून मला योग्य त्या सुचना देवून घाटगे साहेब व त्यांचे पथक संख येथून निघून गेले.त्यानंतर दिनांक 16/06/2021 रोजी मी सांगली कोर्ट येथे असताना मला माझा मित्र संजय चौगुले यांचा दुपारी 1.30 वाजण्याचे सुमारास कल आला होता त्यावेळी त्याने मला तलाठी उदगीरे यांनी कल करण्यास सांगीतले असल्याबाबत निरोप दिला. त्यानंतर दुपारी 02.00 वा चे सुमारास मी माझ्या मोबाईलवरून तलाठी उदगिरे यांना संपर्क केला असता त्यांनी मला त्यांची भेट घेण्याबाबत सांगीतले. त्याप्रमाणे मी घाटगे साहेबांना सदर बाबत माहिती दिली. त्याप्रमाणे घाटगे साहेब, दोन पंच व त्यांचे पथक जत येथे हजर झाले. घाटगे साहेबांनी मला संपर्क केल्यावरून मी घाटगे साहेबांची मार्केट यार्ड जत या ठिकाणी भेट घेतली. त्यावेळी घाटगे साहेब यांनी त्यांचे सोबत नव्याने आलेले पंच महादेव आनंदा बेले यांची पंच



Scanned with CamScanner

म्हणून ओळख करून दिली. त्यानंतर घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे सायंकाळी 06.15 चे दरम्यान मी माझे मोबाईलवरून उदगिरे तलाठी यांना संपर्क

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): NAMDEV BHARAT DANDAGE
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): 15101000402NBD **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

द रा पवार

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): DATTATRAY GOVIND KOLEKAI
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): PCMH90644

ठाणे अंमलदार
उमदी पो.ठाणे



Scanned with CamScanner